मा. सर्वोच्च न्यायालय रिट याचिका क्र.132/2016 मधील निर्देशानुसार दिव्यांग विदयार्थ्यांच्या शिक्षणासाठी कंत्राटी तत्वावर नेमणूक करण्यात आलेल्या विशेष शिक्षकांचे केंद्र शाळांवर "विशेष शिक्षक" पदावर समायोजन करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जिल्हा परिषद आदेश क्रमांक. कार्या-1/पीई-1/ 1071 /2025
अहिल्यानगर, दिनांक. 19 /08/2025

वाचा :- 1. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक.संकिर्ण-2024/ प्र.क्र.747 /टिएनटि-1, दि. 08/10/2024

2. मा.आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील पत्र क्रमांक. असशियो /601/ समायोजन /2025/ 1284380, दि. 11/06/2025

**- : आदेश :-**

उपरोक्त संदर्भिय क्रमांक-01 अन्वये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाचे अनुपालन करण्याच्या दृष्टीने राज्य पातळीवर विशेष शिक्षक' या पदाचा नव्याने समावेश करण्यात आला असून राज्यात सद्यस्थितीत उपलब्ध रिक्त शिक्षकीय पदापैकी प्रत्येक केंद्र स्तरावर एक याप्रमाणे राज्यात कार्यरत कंत्राटी शिक्षकांचे समायोजन करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. समायोजन करण्यात येणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांमध्ये प्रपत्र अ मधील समग्र शिक्षा-समावेशित शिक्षण उपक्रमातील महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई अंतर्गतचे विशेष शिक्षक, प्रपत्र ब मधील अपंग समावेशित शिक्षण (माध्यमिक स्तर) योजने अंतर्गतचे विशेष शिक्षक आणि प्रपत्र क मधील अपंग एकात्म योजना (प्राथमिक स्तर) योजनेंतर्गत माध्यमिक स्तरावरील युनिट कार्यरत विशेष शिक्षक यांचा समावेश आहे. त्यानुसार जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत प्रपत्र अ मधील 121 प्रपत्र ब मधील 05 प्रपत्र क मधील 02अशा एकूण 128 कंत्राटी कर्मचारी समायोजनासाठी पात्र आहेत.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक 08/10/2024 चे शासननिर्णयानवये व मा. आयुक्त (शिक्षण), पुणे यांचेकडील दिनांक 11/06/2025 चे पत्रान्वये अहिल्यानगर जिल्ह्यात कार्यरत खालील रकान्यात दर्शविण्यात आलेल्या समग्र शिक्षा, अपंग समावेशित शिक्षण, अपंग एकात्म योजना मधील कंत्राटी कर्मच्या-याचे समायोजनाने विशेष शिक्षक म्हणुन त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या वेतनश्रेणी वर दिलेल्या केंद्रस्तरावर सोबत दिलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून पदस्थापना करण्यात येत आहे. सदर आदेश शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांक 08/10/2024 पासून लागू करण्यात येत आहे.

| अ क्र | विशेष शिक्षकाचे संपूर्ण नाव | पद | निवड प्रवर्ग | कंत्राटी तत्तवावर नियुक्ती दिनांक | शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता | लागु करावयाची वेतन श्रेणी | समायोजनााने पदस्थापना देण्यात आलेले केंद्र व तालुका | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | |
| 1 | आशिष प्रकाश क्षिरसागर | विशेष शिक्षक | OPEN | 25/8/2011 | B.A.,,B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | मांडवगण | श्रीगोंदा |
| 2 | धनश्री अनुपम शिंदे | विशेष शिक्षक | OBC | 1/11/2007 | B.A.,,B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | विसापुर | श्रीगोंदा |
| 3 | गायकवाड/ आगे निता चंद्रकांत | विशेष शिक्षक | SC | 3/11/2008 | B.A.,D.Ed. (Spl.), | S-14 38600-122800 | देऊळगाव | श्रीगोंदा |
| 4 | दरेकर दिप्ती मधुकर | विशेष शिक्षक | OPEN | 24/8/2009 | B.A.,D.Ed. (Spl.), | S-14 38600-122800 | बेलवंडी | श्रीगोंदा |
| 5 | खेडकर प्रिया कल्याणराव | विशेष शिक्षक | OBC | 1/4/2011 | B.A.,,B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | नारायण आश्रम | श्रीगोंदा |
| 6 | कुऱ्हाडे विदुला विवेकानंद | विशेष शिक्षक | OPEN | 1/4/2011 | ,D.Ed. (Spl.), | S-10 29200-92300 | देवीभोयरे | पारनेर |



Scanned by CamScanner

| अ क्र | विशेष शिक्षकाचे संपूर्ण नाव | पद | निवड प्रवर्ग | कंत्राटी तत्तवावर नियुक्ती दिनांक | शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता | लागु करावयाची वेतन श्रेणी | समायोजनाने पदस्थापना देण्यात आलेले केंद्र व तालुका | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | |
| 7 | सुरवसे छाया कचरू | विशेष शिक्षक | OBC | 1/4/2011 | B.A.,,B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | राजापुर | श्रीगोंदा |
| 8 | भारती शामसिंग परदेशी | विशेष शिक्षक | OBC | 15/6/2011 | B.A.,,B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | पेडगाव | श्रीगोंदा |
| 9 | ज्योती कृष्णराव बोलके | विशेष शिक्षक | OPEN | 3/8/2011 | B.Sc,,B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | कौठा | श्रीगोंदा |
| 10 | अनुपम रामदास शिंदे | विशेष शिक्षक | OBC | 1/8/2006 | B.A.,,B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | वागंदरी | श्रीगोंदा |
| 11 | क्षिरसागर महेश श्रीकांत | विशेष शिक्षक | OBC | 4/11/2008 | B.A.,D.Ed. (Spl.),B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | आल्हणवाडी | पाथर्डी |
| 12 | गिते शशिकांत कुंडलिक | विशेष शिक्षक | NTD | 2/1/2009 | B.A.,D.Ed. (Spl.),B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | येळी | पाथर्डी |
| 13 | आढाव भरत तबाजी | विशेष शिक्षक | OPEN | 25/8/2009 | B.A.,,B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | कणगर | राहुरी |
| 14 | पवार शरद भानुदास | विशेष शिक्षक | OPEN | 28/8/2009 | B.A.,,B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | मांडवे | संगमनेर |
| 15 | लांडगे विजय विठ्ठल | विशेष शिक्षक | OPEN | 1/4/2011 | B.A.,,B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | बेलापुर | अकोले |
| 16 | आढाव सतिष शिवाजी | विशेष शिक्षक | OPEN | 1/4/2011 | B.A.,,B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | येळपणे | श्रीगोंदा |
| 17 | साबळे काशिनाथ नानासाहेब | विशेष शिक्षक | OPEN | 1/4/2011 | B.A.,,B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | साकीरवाडी | अकोले |
| 18 | बानकर महेश दिनकर | विशेष शिक्षक | OPEN | 1/4/2011 | B.A.,D.Ed. (Spl.), | S-14 38600-122800 | सावरकुटे | अकोले |
| 19 | शिंदे उमेश बलभीम | विशेष शिक्षक | NT-B | 1/8/2011 | B.A.,D.Ed. (Spl.), | S-14 38600-122800 | जवळे बाळेश्वर | संगमनेर |
| 20 | आढाव भाऊसाहेब रामदास | विशेष शिक्षक | OPEN | 5/8/2011 | B.A.,,B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | पिंपळगाव टप्पा | पाथर्डी |
| 21 | विश्वभूषण किसन गायकवाड | विशेष शिक्षक | SC | 2/4/2012 | B.A.,,B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | केळी ओतुर | अकोले |



Scanned by CamScanner

| अ क्र | विशेष शिक्षकाचे संपूर्ण नाव | पद | निवड प्रवर्ग | कंत्राटी तत्तवावर नियुक्ती दिनांक | शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता | लागु करावयाची वेतन श्रेणी | समायोजनमाने पदस्थापना देण्यात आलेले केंद्र व तालुका | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | |
| 22 | ढगे रामेश्वर त्रिंबक | विशेष शिक्षक | OBC | 10/1/2013 | B.A.,D.Ed. (Spl.), | S-14 38600-122800 | कुभेफळ | अकोले |
| 23 | शिंदे आबासाहेब विश्वनाथ | विशेष शिक्षक | NT-B | 10/1/2013 | B.A.,D.Ed. (Spl.),B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | पाडोशी | अकोले |
| 24 | बोरूडे मनोजकुमार बबनराव | विशेष शिक्षक | OBC | 10/1/2013 | B.A.,D.Ed. (Spl.),B.Ed. | S-14 38600-122800 | विहीर | अकोले |
| 25 | ठाकूर सुवर्णा कन्हैया | विशेष शिक्षक | OPEN | 11/8/2011 | ,D.Ed. (Spl.), | S-10 29200-92300 | गुहा | राहुरी |
| 26 | शिंदे अलका बाळासाहेब | विशेष शिक्षक | OPEN | 15/10/2011 | B.A.,D.Ed. (Spl.), | S-14 38600-122800 | शेंडी | अहिल्यानगर |
| 27 | मगर सुवर्णा सुनिल | विशेष शिक्षक | OPEN | 3/11/2011 | B.A.,D.Ed. (Spl.),B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | येसगाव | कोपरगाव |
| 28 | आहेर मनोज काशिनाथ | विशेष शिक्षक | OPEN | 13/12/2007 | ,D.Ed. (Spl.), | S-10 29200-92300 | निमोण | संगमनेर |
| 29 | आंबेकर दत्तात्रय विश्वनाथ | विशेष शिक्षक | SC | 28/12/2008 | B.A.,,B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | पारनेर मुले | पारनेर |
| 30 | कडवे संदिप काशिनाथ | विशेष शिक्षक | OBC | 1/11/2011 | B.A.,D.Ed. (Spl.),B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | विठे | अकोले |
| 31 | कवडे सविता शिवनाथ | विशेष शिक्षक | OPEN | 26/12/2006 | B.A.,D.Ed. (Spl.),B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | लोहारे मिरपुर | संगमनेर |
| 32 | मोरे श्रध्दा धनराज | विशेष शिक्षक | OBC | 7/11/2008 | B.A.,,B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | जामगाव | पारनेर |
| 33 | दातीर वर्षा विष्णु | विशेष शिक्षक | NTC | 21/10/2011 | B.A.,D.Ed. (Spl.),B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | आश्वी खु | संगमनेर |
| 34 | गायकवाड संगिता किसन | विशेष शिक्षक | OBC | 21/12/2011 | B.A.,,B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | वरंवडी | संगमनेर |
| 35 | अकोलकर सोनाली राहुल | विशेष शिक्षक | OPEN | 21/6/2012 | B.A.,D.Ed. (Spl.), | S-14 38600-122800 | चिचोंडी | पाथर्डी |
| 36 | नागरगोजे दिपाली आत्माराम | विशेष शिक्षक | NTD | 29/1/2013 | ,D.Ed. (Spl.), | S-10 29200-92300 | साकत | जामखेड |



Scanned by CamScanner

| अ क्र | विशेष शिक्षकाचे संपूर्ण नाव | पद | निवड प्रवर्ग | कंत्राटी तत्तवावर नियुक्ती दिनांक | शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता | लागु करावयाची वेतन श्रेणी | समायोजनाने पदस्थापना देण्यात आलेले केंद्र व तालुका | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | |
| 37 | राऊत महेश प्रभाकर | विशेष शिक्षक | OBC | 27/7/2007 | B.A.,,B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | ढोरजळगाव | शेवगाव |
| 38 | घोडके रोशन विश्वनाथ | विशेष शिक्षक | SC | 6/12/2007 | ,D.Ed. (Spl.), | S-10 29200-92300 | काष्टी | श्रीगोंदा |
| 39 | पोळ प्रसाद बबन | विशेष शिक्षक | SC | 11/12/2007 | B.A.,D.Ed. (Spl.),B.Ed. | S-14 38600-122800 | बारागाव नांदुर | राहुरी |
| 40 | भाटे विश्वास एकनाथ | विशेष शिक्षक | SC | 10/12/2007 | B.A.,D.Ed. (Spl.),B.Ed. | S-14 38600-122800 | ढवळपुरी | पारनेर |
| 41 | शिंदे नितीन रामभाऊ | विशेष शिक्षक | OBC | 1/1/2009 | B.A.,D.Ed. (Spl.),B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | जोर्वे | संगमनेर |
| 42 | कदम संतोष तुकाराम | विशेष शिक्षक | SC | 14/7/2009 | B.Com,D.Ed. (Spl.),B.Ed. | S-14 38600-122800 | जामखेड | जामखेड |
| 43 | मोरे योगेश भैय्यासाहेब | विशेष शिक्षक | OPEN | 16/6/2010 | B.A.,,B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | देवगाव | संगमनेर |
| 44 | लाड ज्ञानेश्वर महादेव | विशेष शिक्षक | NTD | 26/7/2010 | B.A.,D.Ed. (Spl.), | S-14 38600-122800 | हंडाळवाडी | पाथर्डी |
| 45 | लेंडाळ दत्ता बाबासाहेब | विशेष शिक्षक | NTC | 2/8/2010 | B.A.,D.Ed. (Spl.),B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | हातगाव | शेवगाव |
| 46 | अकोलकर राहुल धोंडीभाऊ | विशेष शिक्षक | OPEN | 20/10/2011 | B.A.,D.Ed. (Spl.),B.Ed. | S-14 38600-122800 | करंजी | पाथर्डी |
| 47 | दरेकर राजू बबन | विशेष शिक्षक | OBC | 20/10/2011 | B.A.,D.Ed. (Spl.), | S-14 38600-122800 | घोगरगाव | श्रीगोंदा |
| 48 | दळवी चंद्रकांत पंडित | विशेष शिक्षक | OBC | 20/10/2011 | B.A.,D.Ed. (Spl.), | S-14 38600-122800 | कर्जत | कर्जत |
| 49 | काळे महेश सोमनाथ | विशेष शिक्षक | OBC | 20/10/2011 | B.A.,D.Ed. (Spl.),B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | समशेरपुर | अकोले |
| 50 | क्षिरसागर दत्तात्रय शंकर | विशेष शिक्षक | OBC | 20/10/2011 | B.A.,D.Ed. (Spl.),B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | कळस बु | अकोले |
| 51 | शेंडगे ज्ञानेश्वर राजेंद्र | विशेष शिक्षक | NTC | 20/10/2011 | B.A.,D.Ed. (Spl.), | S-14 38600-122800 | लिंगदेव | अकोले |



Scanned by CamScanner

| अ क्र | विशेष शिक्षकाचे संपूर्ण नाव | पद | निवड प्रवर्ग | कंत्राटी तत्त्वावर नियुक्ती दिनांक | शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता | लागु करावयाची वेतन श्रेणी | समायोजनाने पदस्थापना देण्यात आलेले केंद्र व तालुका | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | |
| 52 | बोधले विनोद महादेव | विशेष शिक्षक | OPEN | 31/10/2011 | B.A.,,B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | पारगाव | श्रीगोंदा |
| 53 | खेमनर किशोर अमृता | विशेष शिक्षक | NTC | 9/12/2011 | B.A.,D.Ed. (Spl.), | S-14 38600-122800 | कोतुळ | अकोले |
| 54 | सोनवणे मोहिनीराज प्रल्हाद | विशेष शिक्षक | OBC | 26/12/2011 | B.A.,D.Ed. (Spl.), | S-14 38600-122800 | सोनई | नेवासा |
| 55 | लाड मदन मारूती | विशेष शिक्षक | NTD | 27/12/2011 | B.A.,D.Ed. (Spl.), | S-14 38600-122800 | देडगाव | नेवासा |
| 56 | देशमुख संकेत त्र्यंबक | विशेष शिक्षक | OBC | 29/12/2011 | B.A.,D.Ed. (Spl.), | S-14 38600-122800 | गणोरे | अकोले |
| 57 | लांडगे सुधीर रामभाऊ | विशेष शिक्षक | OPEN | 1/1/2012 | B.A.,,B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | थेरगाव | कर्जत |
| 58 | साठे संतोष अर्जुन | विशेष शिक्षक | OBC | 3/1/2012 | B.A.,,B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | घोडेगाव | नेवासा |
| 59 | जाधव अनिल देविचंद | विशेष शिक्षक | VJA | 21/1/2012 | B.A.,D.Ed. (Spl.), | S-14 38600-122800 | श्रीगोंदा | श्रीगोंदा |
| 60 | देशमुख राहुल नारायण | विशेष शिक्षक | OPEN | 14/2/2012 | B.A.,,B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | ब्राम्हणवाडा | अकोले |
| 61 | राऊत विशाल माणिक | विशेष शिक्षक | OBC | 15/3/2012 | B.A.,,B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | खेड | कर्जत |
| 62 | जहांगीर कमाल मुलाणी | विशेष शिक्षक | OBC | 10/4/2012 | B.A.,,B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | मढेवडगाव | श्रीगोंदा |
| 63 | पवार संतोष नेमिचंद | विशेष शिक्षक | VJA | 15/9/2012 | B.A.,D.Ed. (Spl.),B.Ed. (Spl.) | S-14 38600-122800 | आढळगाव | श्रीगोंदा |

अटी व शर्ती:

1. वरील कंत्राटी कर्मचारी सद्यास्थितीत ज्या शाळा/केंद्र/तालुका/जिल्हा स्तरावर कार्यरत आहेत त्यांना त्याच ठिकाणी दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सेवा उपयोगात आणण्यास समायोजित करण्याचे वरील शासन निर्णयातील निर्देश विचारात घेता वरीलप्रमाणे पदस्थापना देण्यात येत आहे, तसेच त्यांचे संनियंत्रण संबंधित केंद्र प्रमुखाच्या अधिनस्त राहील.
2. समायोजन करण्यात येणा-या वर नमूद विशेष शिक्षक भारतीय पुनर्वास परिषद [RCI-Rehabilitation Council of India) द्वारे विशेष शिक्षक या पदासाठी निर्धारित केलेली शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण केलेली, RCI द्वारे दिनांक 11.01.2012 चे पत्रान्वये दिलेल्या शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेच्या मार्गदर्शक तत्वानुसार नोंदणीकृत असला पाहिजे तसेच प्रमाणपत्र वैधता संदर्भातील निकषांची, पूर्तता केलेली असणे आवश्यक आहे.



Scanned by CamScanner

3. शासन पत्र, शालेय शिक्षण विभाग, दिनांक 13.12.2024 अन्वये भारतीय पुनर्वास परिषद (RCI) नोंदणी प्रमाणपत्र नूतनीकरणास 6 महिन्याची मुदत देण्यात आली आहे. उक्त शासन निर्देशानुसार नूतणीकरण पूर्ण होईपर्यंत त्यांची पुढील वेतनवाढ रोखण्यात येईल, तसेच, RCI नोंदणी प्रमाणपत्र नूतनीकरणाबाबत RCI यांचेकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या सूचना निर्देश समायोजित होणा-या विशेष शिक्षकास लागू राहतील. भारतीय पुनर्वास परिषद (RCI) नवी दिल्ली यांचेव्दारे दर पाच वर्षांच्या कालावधीमध्ये आयोजीत सातत्यपूर्ण पुनर्वसन शिक्षण व प्रशिक्षण (CRE) करणे बंधनकारक राहिल. सदर प्रशिक्षणाचा कालावधी हा कर्तव्य कालावधी म्हणुन ग्राह्य धरणेत येईल.
4. समायोजन झाल्यानंतर शासन निर्णय दि. 08.10.2024 मधील तरतूदीनुसार विशेष शिक्षकांची इ. 1 ली ते 12 वी पर्यंतच्या सर्व शाळा स्तरावरील दिव्यांग विद्यार्थ्यांना शिकविण्याची क्षमता असली पाहिजे यासाठी त्यांनी विशेष शिक्षण शाखेतील B.Ed. (Spl) / समकक्ष अर्हता आणि D.Ed. (Spl)/ समकक्ष अर्हता ही व्यावसायिक अर्हता धारण करणे आवश्यक राहील. वरील दोन्ही नसल्यास अर्हतेपैकी एक अर्हता धारण करीत अशी अर्हता समायोजित होणा-या कर्मचा-यास सेवांतर्गत स्वरूपात धारण करणे बंधनकारक राहील. (उदा. सध्या विशेष शिक्षण शाखातील B.Ed. (Spl) / समकक्ष अर्हता असलेल्या शिक्षकाने D.Ed. (Spl)/ समकक्ष अर्हता धारण करणे तसेच विशेष शिक्षण शास्रातील D.Ed. (Sp) /समकक्ष अर्हता असलेल्या शिक्षकाने B.Ed. (Spl) समकक्ष अर्हता धारण करणे आवश्यक राहील) अशी अर्हता पूर्ण करण्याकरीता शासन स्तरावरून सध्या निश्चित केलेल्या व भविष्यात लागू करण्यात येणा-या अटी व शर्ती संबंधित विशेष शिक्षकास लागू राहतील.
5. केंद्र स्तरावरील प्रत्येक विशेष शिक्षकाला RCI ने शिफारस केलेल्या बहु-अपंग प्रवर्गाचे (Matti category Disability) (बहु अपंग प्रवर्ग शिक्षक) चे प्रशिक्षण कार्यक्रम अथवा अभ्यासक्रम निश्चित करून प्रशिक्षणाचे प्रारूप व प्रशिक्षण पूर्ण करण्यास कालावधी निर्धारीत करण्याबाबत शासन स्तरावरून निर्गमित निर्देश वरील विशेष शिक्षकांना लागू राहतील.
6. वरील शिक्षकांना आरक्षणनिहाय बिंदूवर समायोजित करण्यात येत असून बिदुनामावली नुसार विशिष्ट प्रवर्गाचे उमेदवार अतिरिक्त ठरत असल्यास त्यांना शून्य बिंदूवर समायोजित करून, त्या संबंधित प्रवर्गाचे बिंदू भविष्यात रिक्त झाल्यानंतर त्यांना त्या-त्या बिंदूवर समायोजीत करण्यात येईल.
7. समायोजनानंतर विशेष शिक्षकांच्या सेवा केंद्रांतर्गत समाविष्ट शाळेतील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी उपयोगात आणल्या जातील याबाबत दक्षता घ्यावी.
8. केंद्रांतर्गत घटक शाळेत दिव्यांग विद्यार्थी नसल्यास समायोजित विशेष शिक्षकाने सामान्य शिक्षकाप्रमाणे इतर विषयाचे देखील अध्यापन करणे बंधनकारक राहील, जेणेकरून त्यांच्या सेवेचे पूर्ण उपायोजन होवू शकेल.
9. केंद्र स्तरावरील विशेष शिक्षक पदाचे सेवा विषयक नियम व अटी शर्तीबाबतचे प्रारूप तयार करण्याची प्रक्रीया सुरू असल्याने समग्र शिक्षा अभियानांतर्गत प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील विशेष शिक्षकासाठी सद्यस्थितीत लागू असलेली सर्व कर्तव्ये व जबाबदाऱ्या वरील विशेष शिक्षकांनी पार पाडणे बंधनकारक राहील, तसेच विशेष शिक्षक पदाचे भविष्यात शासन स्तरावरून निर्गमित होणारे सेवा विषयक नियम, अटी व शर्ती संबधितांना लागू राहतील.
10. समायोजनानंतर कंत्राटी कर्मचारी नियुक्तीच्या केंद्रावर रुजू झाल्यानंतर शासन निर्णय दिनांक 08.10.2024 मधील निर्देशानुसार वरील विशेष शिक्षक धारण करीत असलेल्या शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेनुसार स्तंभ क्रमांक-07 मध्ये नमूद केलेली वेतनश्रेणी शासन निर्णय निर्गमित झाल्याचे दिनांक 08.10.2024 पासून अनुज्ञेय राहील. सदर विशेष शिक्षकांचे मूळ सेवापुस्तक व सेवाविषयक बाबी गटशिक्षणाधिकारी हे हाताळतील.
11. प्राथमिक शिक्षकास देय असलेल्या 22020173(36) या लेखाशिर्षातूनच वेतन अदा करण्यात येईल.
12. जिल्हा परिषदेअंतर्गत शिक्षकांना लागू असलेल्या अन्य सर्व सेवाशर्ती सदर विशेष शिक्षकांना जसेच्या तसे लागू राहतील.
13. सदर आदेशानुसार समायोजित करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या व्यावसायिक अर्हतांशी संबंधित विद्यापीठांकडून पडताळणी करण्याची कार्यवाही आदेश निर्गमित होताच शिक्षणाधिकारी (प्राथमिक) हे करतील.
14. उक्त आदेशातील अ.नं.. 1 ते 24 वरील महानगरपालिका क्षेत्रातील विशेष शिक्षक प्रत्यक्ष महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रत्यक्ष काप करणार आहेत. त्यामुळे त्यांची पदस्थापना दिलेल्या केंद्रामध्ये दिव्यांग विदयार्थी असल्यास अशा केंद्राचा पदभार नजिकचे केंद्रातील विशेष शिक्षकांकडे सोपविण्याची कार्यवाही गटशिक्षणाधिकारी यांनी करावी.
15. सदर समायोजन प्रक्रियेदरम्यान कायमस्वरुपी समायोजनानंतर कंत्राटी कर्मचाऱ्याने सादर केलेले शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेंचे तसेच इतर दस्ताऐवज बनावट अथवां चुकीचे आढळून आल्यास कंत्राटी कर्मचा-यास समायोजनाद्वारे देण्यात आलेली पदस्थापना कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल व उचित फौजदारी कार्यवाही करण्यात येईल.
16. सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रमांक बीसीसी 2011/प्र. क्र. 1064/2011/16 व दिनांक 12/12/2011 नुसार मागासवर्गीय उमेदवार यांना जात वैधता प्रमाणपत्र रुजू होताना सादर करणे आवश्यक आहे. तसेच समायोजन झालेल्या मागासवर्गीय उमेदवाराकडे जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास 6 (सहा) महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील, विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास संबंधित उमेदवाराची सेवा आपोआप संपुष्टात येईल.
17. चारित्र्य पडताळणी अहवाल अनुकूल राहण्याच्या, वैद्यकीयदृष्ट्या सक्षम असल्याचे प्रमाणपत्र सादर करण्याच्या आणि व्यावसायिक अर्हतेच्या मुळ कागदपत्रे वैध असण्याच्या अधिन राहून नियुक्ती स्विकारत असल्याचे व वरीलपैकी कोणत्याही बाबींची पूर्तता न झाल्यास तात्काळ प्रभावाने सेवा संपुष्टात आणण्यास हरकत नसल्याबाबतचे रुपये 500/- चे स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र /हमीपत्र कर्तव्यावर रुजु होताना सादर करावे लागेल. कार्यालय प्रमुखाने आदेशात नमूद हमीपत्र घेऊन नंतरच रुजू करुन घ्यावे. कर्तव्यावर रुजू होतांना प्रथमतः कार्यालय प्रमुखांकडे उपस्थित होणे अनिवार्य राहील. परस्पर आवक शाखेमध्ये रुजू प्रतिवेदन सादर करता कामा नये.



Scanned by CamScanner

18. सदर आदेश मिळताच 15 दिवसाचे आत कर्तव्यावर रुजू व्हावे लागेल, अन्यथा त्यांची नेमणूक आपोआप रद्द झाली असे समजण्यांत येईल, तसेच विहीत मुदतीत रुजू न झाल्यास नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या पूर्व परवानगीशिवाय रुजू करुन घेऊ नये.
19. सदर समायोजन आदेश हे शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय परिपत्रके व पत्रातील मार्गदर्शक सूचनेनुसार आदेशानुसार देण्यात आलेले आहेत.
20. कर्तव्यावर रुजू झालेल्या दिनांकापासून एक महिण्यांचे आत महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (सेवा भरती) नियम 1967 चे नियम 4 अन्वये जिल्हा शल्य चिकित्सक संबंधित वैद्यकिय अधिकारी यांचे कडून प्राप्त केलेले आरोग्य सुदृढ असल्याचे प्रमाणपत्र त्वरीत सादर कराये लागेल. अन्यथा सदर नियुक्ती रद्द करण्यात येईल.
21. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक चारित्र्य-2117/प्र.क्र.483/2017/16-अ दिनांक 28 ऑगस्ट 2017 मधील तरतुदीनुसार निवड झाल्यानंतर रुजू होतांना स्वयंसाक्षांकित साक्षांकन नमुना सादर करावा लागेल.
22. सदर उमेदवाराची नियुक्ती ही संबंधित जिल्हा पोलिस अधीक्षक / पोलिस आयुक्त यांचे कडून चारित्र पडताळणीच्या अधीन राहून देण्यात येत आहे चारित्र्य पडताळणीचा अहवाल प्रतिकूल आढळल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता सेवा समाप्त करण्यात येईल.
23. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक प्रशिक्षण-2000/प्र.क्र.61/2001/39 दिनांक 19 मार्च 2003 मधील तरतूदीनुसार नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत संगणक परीक्षा उत्तीर्ण करावी लागेल. विहित कालावधीत संगणक परीक्षा उत्तीर्ण न केल्यास सेवा समाप्त करण्यात येईल.
24. भारताच्या संविधानाप्रती श्रध्दा व खरी निष्ठा बाळगण्याविषयी प्रपत्र-अ तथा प्रपत्र ब मध्ये शपथ घ्यावी लागेल.
25. सदर नोकरी सोडावयाची इच्छा झाल्यास एक महिना अगोदर त्याविषयीची जिल्हा परिषदेला सूचना द्यावी लागेल व तसे न केल्यास एक महिण्याचा पगार जिल्हा परिषदेच्या स्वाधीन करावा लागेल.
26. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई कडील अधिसूचना क्र. एसआरव्ही-2000/ प्र.क्र. (17/2001/12. दिनांक 28 मार्च, 2005 चे नियम 3 मधील तरतूदीनुसार सदर नियम अंमलात आल्याच्या दिनांकापासून पुढे अपत्यांची (मुले/मुली) संख्या-2 पेक्षा अधिक झाल्यास सदर कर्मचारी सेवामुक्त करण्यास पात्र राहील. याबाबत त्यांना यासोबत जोडलेल्या नमुना-अ मध्ये प्रतिज्ञापत्र लिहून द्यावे लागेल.
27. महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम 1967 मधील नियम 08 नुसार शासनाने विहीत केलेली किंवा वेळोवेळी विहीत करील अशा भाषा परीक्षा/प्रशिक्षण अर्हता उत्तीर्ण करणे/ सूट प्राप्त करन घेणे बंधनकारक राहील अन्यथा वेतनवाढ थांबविण्याची कार्यवाही अनुसरण्यात येईल, तसेच सेवेत नियमित अथवा स्थायी करता येणार नाही.
28. शासन निर्णय दिनांक 31.10.2005 आणि दिनांक 13.06.2017 व शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक रानियो-2022/प्र.क्र.34/सेवा-4 दिनांक 31.03.2023 अन्वये दिनांक 01.11.2005 रोजी किंवा त्यानंतर सेवेत नियुक्त झालेल्या कर्मचा-यांना परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन / राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली लागू असून शासन निर्णयातील तरतुदीनुसार शासन सेवेत नियुक्त होणा-या उमेदवाराने नियुक्त झाल्यावर सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक-04 अन्वये 08 दिवसाचे आत विकल्प सादर करणे आवश्यक राहील, तसेच शासनाने वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार अनुषंगिक लाभ देय राहतील.
29. शासन निर्णय, वित्त विभाग क्र. रप्रस-1114/प्र.क्र.1/सेवा-5, दिनांक 10 जून 2015 मधील तरतुदीनुसार नियुक्तीचे दिनांकापासुन सहा महिन्याचे आत उमेदवारास स्वग्राम घोषित करणे बंधनकारक राहील.
30. सदर आदेशाने नियुक्ती दिल्यानंतर संबंधितांचे नियुक्तीबाबत कोणीही आक्षेप घेतल्यास व प्राथमिक चौकशी अंती त्यात तथ्य आढळून आल्यास अगर नियुक्तीचे वेळी नियुक्तीसाठी सादर केलेली माहिती चुकीची आढळून आल्यास दिलेली नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर व कोणत्याही वेळी रद्द करण्यात येईल.
31. ग्रामविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील दिनांक 23/12/2021 चे शासननिर्णयान्वये संबधीत विशेष शिक्षक यांचेकडुन अति प्रदान रक्कमेच्या अनुषंगाने वचनपत्र गट शिक्षणाधिकारी यांनी रुजु दिनांकास घेण्यात यावे.
32. संबंधित उमेदवार ज्या पंचायत समितीमध्ये हजर होतील त्या पंचायत समितीचे गट शिक्षणाधिकारी यांनी सदरहू आदेशातील अनुक्रमांक 19,22,23 मधील अटीची पूर्तता संबंधित उमेदवाराकडून तात्काळ करून घेऊन त्याची नोंद त्यांच्या सेवापुस्तकात घेऊन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा तसेच रुजू होताच रुजू अहवाल या कार्यालयात सादर करावा.
33. वेळोवेळी निर्गमित होणारे सेवाशर्ती बाबतचे शासन निर्णय, परिपत्रके उमेदवारास बंधनकारक राहतील. सदर समायोजन आदेश शासन निर्णय निर्गमित झाल्याचे दिनांक 08/10/2024 पासून वेतन, भत्ते व अनुषंगीक लाभ लागू राहतील. तरी आदेशात नाव नमूद समायोजित विशेष शिक्षकाने आदेश प्राप्त होताच तात्काळ पदस्थापनेने दिलेल्या केंद्रात रुजू व्हावे.
34. दिव्यांग विदयार्थ्यांच्या शिक्षणासाठी कंत्राटी तत्वावर नेमणूक करण्यात आलेल्या विशेष शिक्षकांचे केंद्र शाळांवर "विशेष शिक्षक" पदावर समायोजन करणे ही संपूर्ण प्रशासकीय बाब असल्याने कोणत्याही कर्मचा-याने राजकीय दबाव आणल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम 1967 मधील नियम 6(5) चा भंग केला म्हणून शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in यासंकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक 202508191600086 --------------- असाआहे.

Signed by Bhaskar Jagannath Patil
Date: 19-08-2025 20:59:54

(भास्कर पाटील)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद अहिल्यानगर

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 19-08-2025 20:51:15

(आनंद भंडारी भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर



Scanned by CamScanner

प्रति,

श्री/श्रीम.------------------------- विशेष शिक्षक

जिल्हा परिषद शिक्षण विभाग(प्रा) अहिल्यानगर/ गटशिक्षण कार्यालय पंचायत समिती (सव)---------/

शिक्षण विभाग म.न.पा. अहिल्यानगर

प्रतिलिपी :- माहिती व कार्यवाहीस्तव अग्रेषित.

1. मा.आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
2. आयुक्त म.न.पा.अहिल्यानगर
3. मुख्य लेखा व वित्त अधिकारी / उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा) / शिक्षणाधिकारी (प्राथ.) जि.प. अहिल्यानगर
4. गट विकास अधिकारी पंचायत समिती ------------
5. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती ------------ /प्रशासन अधिकारी म.न.पा.अहिल्यानगर
   2/- आपण संबंधित उमेदवरांना पदस्थापना झालेल्या केंद्रस्तरावर रुजू करुन तसा अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा.
6. श्री/श्रीमती/कु ----------------------------------------, विशेष शिक्षक यांनी सोबत देण्यांत आलेल्या व आदेशात नमूद करण्यांत आलेल्या अटी व शती नुसार हमीपत्र तात्काळ रु.500/- च्या मुद्रांकावर तयार करुन या कार्यालयास सादर करावे.
7. निवडनस्ती

स्वाक्षरी---
(भास्कर पाटील)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद अहिल्यानगर

स्वाक्षरी---
(आनंद भंडारी भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर



Scanned by CamScanner